म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# स्त्री गीतें व भक्ति गीतें

REFBK-0018304
REFBK-0018304

सौ. प्रमिला भागवत

৭৫৩০৪

৬৩৮৫৫

১২/৩/৬৯

৭৫৫৬

[illegible] সংগ্রাহক, [illegible]

৩৩১৩৫

[illegible] ৬৪৫৫৫ [illegible] ১২/৩/৬৯

[illegible] ৭৫৫৬

[illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 9C308
ग्रंथ

REFBK-0018304
REFBK-0018304

# स्त्रीगीतें व भक्तिगीतें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

सौ. प्रमिला भागवत

प्रकाशक :
सौ. प्रमिला भागवत
रामदासपेठ, नागपूर.

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

मूल्य : रु. १–५०

मुद्रक :
गो. बा. भिडे
अरुण प्रिंटिंग
धंतोली, नागपूर.

माझे काव्य चोखंदळपणे वाचणारे माझे रसिक वडिल

**श्री. श्रीपाद दत्तात्रय जोशी**

व

साहित्य क्षेत्रांत मला सतत प्रोत्साहन देणारी माझी आई

**सौ. मथुराबाई जोशी**

यांना प्रेमादरपूर्वक समर्पण

—सौ. प्रमिला

# ओळख

हा माझा दुसरा काव्यसंग्रह म्हणण्यापेक्षा गीतसंग्रह असच मी म्हणते. कारण ह्यांतली प्रत्येक कविता ही गेय आहे. तिला ध्रुवपद आहे. तिला तालाच्या व सुरांच्या चौकटीत व्यवस्थित बसवली आहे. कौटुंबिक जीवनांत जे नाना तऱ्हेचे सण व उत्सव-समारंभ येतात त्या त्या प्रसंगी ही गीतं आपोआप स्फुरली, ती सर्व एकत्रित केली व आपल्यापुढे ठेवली. भक्ति गीतांचहि तसंच दर आठवड्यांतलं गुरवारचं भजन आटोपलं तरी त्याचा नाद त्यांतील शब्द माझ्या मनांत घुमतं राहायचे आणि त्या दिव्य अनुभूतीतून सहजपणे भक्तिगीत चाल व ताल ह्या सह अविर्भूत व्हायचं असं होता होता २५-३० भक्ति गीतं तयार झाली. नंतर अशा तऱ्हेने स्त्रियांच्या दृष्टीनी महत्वाची व प्रसंगाची शोभा वाढवणारी ही सारी गीतं व भक्तीगीतं एकत्रित करुन त्यांच पुस्तक काढावं असं मनानं ठरवलं व ती योजना माझी आई सौ. मथुराबाई जोशी हिला सांगितली सौ. आईस ती पसंत पडली, एवढंच नव्हे तर पुस्तक काढण्यास तिनेच वारंवार प्रोत्साहन दिले व त्यामुळेच ती योजना प्रत्यक्षांत उतरुं शकली. हीं माझ्या दृष्टीने अतिशय आनंदाची गोष्ट आहे. ताराबाईसारख्या बाई ज्ञानाने व अनुभवाने प्रगल्भ असणाऱ्या अधिकारी व्यक्तिने त्या गीतांची वाखणणी करावी ही त्याहून आनंदाची गोष्ट. आणि यमूताई सारख्या अभिजात लेखिकेने त्याबद्दल प्रशंसोग्दार काढावे हे त्याहूनहि अभिमानास्पद. अशी थोरामोठ्यांनी पाठ थोपटली म्हणजे खरोखरच आपल्या कार्याची कृतकृत्यता झाल्याचे समाधान आपणास लाभते. तसे ते मला लाभत आहे. आपणासाऱ्या रसिक वाचकांकडून योग्य ती दाद पुस्तकाला मिळेल अशी अपेक्षा करते. पुस्तकास आत्मीयतेने प्रस्तावना लिहण्याचं कामं श्री. ताराबाईनी तसेच वेचक चार शब्द लिहण्याचं काम

सौ. यमूताईनी केल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढें थोडे. पुस्तकं छपाईचं काम चोखपणे बजावल्या बद्दल श्री गोपाळ भिडे याना धन्यवाद

---

सर्वात शेवटी पुस्तकाचे काम निर्विघ्नपणे पार पडल्याबद्दल त्या जगन्नियंत्याला धन्यवाद देऊन त्याचे आशीर्वाद मागते.

**सौ. प्रमिला**

# -: प्रस्तावना :-

सौ. प्रमिलाताईंनी लिहिलेली भक्तिगीत आणि स्त्री गीत या पुस्तिकेवर मी प्रस्तावना लिहावी म्हणून त्यांनी प्रेमळ आग्रह धरला. खर म्हणजे त्यांचा मित्र परिवार आणि ओळखी काही कमी नाहीत. अन् अधिकार परत्वे हा मान आणखी कुणासहि देता आला असता पण मला वाटत भक्तीच्या आंतरिक ओढीतून त्यांना मी दिसले असेन. सौ. प्रमिलाताईचा स्वच्छ, निर्मळ स्वभाव त्यांच्या गीता मधून प्रतिबिम्बत होतो आहे. काव्य रचने करिता सूक्ष्म पारदर्शिक दृष्टी लागत असते. तसेच सर्व साधारण वाचकांना आकलन होणारं अन् हृदयाला जाऊन भिडणारं काव्य जन्माला येण्या करिता सर्व ठिकाणी समभावात्मक विचारही लागतात उदा:—

तेजाने तिमिरास जिंकीले । ज्ञानाने अज्ञान नाशिले ।

असूरमर्दण्या सूरपति आले । प्रेम भराने करु आरती ॥१॥

हे राम जन्माच्या गीतांतील शेवटचे कडवे पहा. ज्ञान सूर्याचा जन्म होताच अज्ञानरुपी अंध:कार टिकू शकत नाही हे. कवयित्रीस म्हणावयाचे आहे. सूर्यवंशी रामाचे "ऐशा या शुभमंगलकाली । श्री विष्णू अवतारती जगती"॥ या जिव्हाळ्याच्या ओवीमध्यें लेखिकेने देवत्वाची महतीही वर्णन केलेली आहेच. अशा प्रकारच्या काव्य रचने मधून भक्तिरसा बरोबर शांतरसाचीहि अनुभूति जाणवते भारतीय स्त्रीचं सुंदर व्यक्ति दर्शन स्त्री गीता मधून घडतं भारतीय स्त्री आपल्या घरातल्या मंगल कार्यात किती एकात्मपणानं समरस होते. हे स्त्री गीतामधल्या ओवी ओवीतून दिसून येते. आपल्या कौटुंबिक जीवनांत व्रतबंध, लग्न, डोहाळे, धाणा घालणे, विहिणी दोन्ही पक्षाकडील बारसे इत्यादि जे प्रसंग येतात, त्या प्रसंगांना अनुलक्षून जी गीते रचली आहेत त्या सर्व गीता मधून काव्य धारा सुबोध आणि सोज्वळ वाहत असल्याचे वाचक बंधु भगिनींच्या सहज लक्षांत येईल त्यांचे "तीळ गुळांतील" भाव बघा.

"धागे गुंफू नाजूक स्नेहल,
कोष करुयां कोमल मंगल ।
सौहार्दाचा सुंदर परिमल
जनभृंगाला त्यांत रमवूं या ॥

तसेच श्रीकृष्ण जन्माचे गाणे--

मध्यरात्र काळोखी, वद्य अष्टमी तिथी ।
मथुरेला कृष्णनाथ, आज सखे जन्मती ॥

या पद्यपंक्तीत शब्द माधुर्याचा आस्वाद घेताना शब्दचित्रें ही डोळ्या समोर येतात

"मथुरेला कृष्णनाथ आज सखे जन्मती ।"

या ओळी बरोबर शब्द लालित्यहि स्पर्शून जाते आणि भक्तिरसही उचंबळून येतो.

भक्ति गीते भक्तिरस पूर्ण आहेत. घराघरा मधून लेकी-सुना आणि बरोबरीच्या भगिनींनी हे पुस्तक संग्रही ठेवून अर्थपूर्ण गीतांची आंतरिक ओळख करुन घेतली पाहिजे

"चंद्राकार वाहे भीमा मध्ये वाळवंट"
"ज्ञानदेव तुकयाला विठ्ठलाचा संग"

पूर्वी जसा मुक्ताबाई, जनाबाई, मीराबाई यांना आपल्या अभगांतून पांडुरंगाचे प्रेम व्यक्त करीत असतांना अव्यक्त आत्मतत्व साकार स्वरुपांत आणतांना-देहात्म बुद्धीचा विसर पडलेला होता तशाच तद्रूपतेच्या भूमिकेतून सौ. प्रमिलाताईनी पांडुरंग उभा केला आहे.–

"सर्व संचिताचे पुण्य फळा आले,
मज कैवल्य भेटले सये ग ॥

किंवा

ही माझी पंढरी, पंढरी । भेटी द्याया हसत मुखाने
स्वयेंच ये श्रीहरी श्रीहरी ॥

भक्तीचा आग्रह, जवळीक, मी तूं पलीकडचा सखा पांडुरंग, लेखिकेनं जिव्हाळ्यानं उभा केला आहे

"मी तुजला पाहते देवा,
जळी-स्थळी पाषाणी तुजला,
तुजला मी शोधते" ।।

असा अंतरबाह्य आकुल भाव, प्रेमादिभक्ती त्यांच्या काव्यांत सर्व ठिकाणी वाहत असलेली आढळते व परम भक्त प्रमिलाताईच्या अंतरंगाचे ही दर्शन होते.

विशेषता ही की कोणतेही गीत वाचीत असतांना त्याचा अर्थ ओळी बरोबर सहज आकलन होतो. आणि पदामध्ये रागांची माहिती ही शास्त्र-शुद्ध आहे. तसेच लेखिका सुंदर आवाजांत व मधुर स्वरांत गात असल्या-मुळे तालबद्ध व रागबद्ध पदांची मांडणीही सुमधुर केलेली आहे. पदें अनेक रागांतून आळविली गेलीं आहेत. तीत भीमपलास, देशकार, तिलंग, दरबारी कानडा ठुमरी–भैरवी इत्यादि हे रचित असतांना शब्दांची कुठेही ओढाताण नाही. अशीच समृद्ध काव्य निर्मिती अधिकाधिक त्यांच्या कडून घडो ही त्या दयाघना जवळ प्रार्थना करुन मी माझी प्रस्तावना पुरी करतें.

**ताराबाई बुटी**

# अनुक्रमणिका


| अ क्र. | | पान नं. |
|---|---|---|
| १ | घाण्याच्या ओव्या (वधू पक्षाकडील) | १, २ |
| २ | घाण्याच्या ओव्या (वर पक्षाकडील) | ३, ४ |
| ३ | विवाहाची मंगलाष्टके | ५, ६ |
| ४ | अभिनंदन | ७ |
| ५ | विहीण (मुलाकडची) | ८ |
| ६ | विहीण (मुलीकडची) | ९ |
| ७ | कांही उखाणे | १० |
| ८ | पाठवणी | ११ |
| ९ | आरती मंगळागौरीची | १२ |
| १० | आरती हरितालिकेची | १३ |
| ११ | आरती शारदेची | १४ |
| १२ | आरती जगदंबेची | १५ |
| १३ | आरती वडाची | १६ |
| १४ | आरती जिवतीची | १७ |

| अ. क्र. | | पा. नं. |
|---|---|---|
| १५ | आरती हनुमंताची | १८ |
| १६ | डोहाळे १ | १९ |
| १७ | डोहाळे २ | २० |
| १८ | डोहाळे ३ | २१ |
| १९ | पाळणा (मुलाचा) | २२ |
| २० | पाळणा (मुलीचा) | २३ |
| २१ | मातृभोजन | २४ |
| २२ | व्रतबंधाची मंगलाष्टके | २५ |
| २३ | तुलसी-विवाहाची मंगलाष्टके | २६ |
| २४ | गाणे खेळाचे | २७, २८ |
| २५ | गाणें तिळगुळाचे | २९ |
| २६ | गाणें कृष्णजन्माचे | ३० |
| २७ | गाणें रामजन्माचे | ३१ |
| २८ | गाणें रंगाचे | ३२ |
| २९ | गोपालकाला | ३३ |

भक्तिगीतें १ ते ३०

आत्मबोध

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. 96304

॥ श्री ॥

# घाण्याच्या ओव्या (वधू पक्षाकडील)

विवाह प्रसंगी 'घाणा' भरण्याची एक मंगल प्रथा आपल्याकडे आहे. त्यावेळी सुवासिनी ओव्या म्हणून प्रसंगाला शोभा आणतात. अशा प्रसंगी साजेशा ओव्या खाली दिल्या आहेत.

प्रारंभी नमन । करुं मोरयाला
या हो सिद्धतेला । सर्वा आधी ॥१॥

तुम्ही येता क्षणी । पळती विघ्ने दूर
प्रताप ऐसा थोर । काय वानूं ॥२॥

मंगल कार्य हे । ........ बाईचे
लाडक्या बहिणीचे । भावंडांच्या ॥३॥

काय बाई सांगू । भाग्याची माझी लेक
होतसे कवतुक । घरी दारी ॥४॥

म्हणती लेकीवर । बापाची माया मोठी
परघरी जाणार ती । म्हणुनी कां ? ॥५॥

पाहुनी शुभ दिन । मुहूर्त आज केला
पांच सुवासिनी आल्या । मदतीला ॥६॥

नको कांही उणे । तयारी जय्यत
ठेवावी बडदास्त । विहीणबाईंची ॥७॥

चौरंगी बैसवोनी । विहीणींचे पाय धुवा
नारळ बाई हवा । ओटीसाठी ॥८॥

लाडू गडू परी । घीवर तारफेण्या
रुख्वता शोभा आणा । कौशल्याने ॥९॥

बापाजी तालेवार । खिसा ठेवा जरा सैल
लग्नाचा डामडौल । आहे मोठा ।।१०।।

दारी घातलासे । मांडव ऐसपैस
पाहूणे शेपन्नास । यायचेत ।।११।।

येणाऱ्या सकलांची । चौकशी करा नीट
खाण्यापिण्याची कपात । करु नका ।।१२।।

झाल्या केल्यासाठी । जोडावे गणगोत
सारी माणसे हवीत । कार्यामधे ।।१३।।

आल्या साऱ्या जणी । मावशी आत्या मामी
कौतुका नाही कमी । .... ताईच्या ।।१४।।

धुमधडाक्यांत । लग्नाचा करु थ.ट
वरद राहो हस्त । अंबाबाईचा ।।१५।।

● ● ● ●

## घाण्याच्या ओव्या (वर पक्षाकडील)

प्रारंभी नमन । मंगल मुरतीला
आमुच्या कार्याला । सिद्धी द्यावी ॥१॥

नारळी तोरण । दारावरी लावा
शकून तो व्हावा । सौख्यदायी ॥२॥

पानांनी फुलांनी । मांडव सजवा ग
भाग्याचा दिवस ग । आज खरा ॥३॥

वर माय आज । होतसे .... ताई
जाहली तिला घाई । सुन्मुखाची ॥४॥

.... नवरदेव । बांधून मुंडावळया
लग्नासी जाहला । सज्ज आता ॥५॥

अहो .... ताई । कशाची एवढी घाई
आहे कां काम काही । आज घरी ॥६॥

होय ग सखेबाई । येणार नवी सून
चालेल् कां बसून । सांग तरी ॥७॥

लगीन भावाचे । मुहूर्त आज करुं
नखोले, गव्हले वळूं । खिरीसाठी ॥८॥

मुगवडे घालूं । चला ग मुहूर्तानं
भावाचं लगिन । .... बाईच्या ॥९॥

कुर्डया पापडया । कशासाठी केल्या
मामाच्या लगिनाला । .... ताईच्या ॥१०॥

गूळ साखरेच्या । गोण्या ह्या कशासाठी
मामाच्या लग्नासाठी । ....बाळाच्या ॥११॥

काकू नि आत्या आली । मावशी तशी मामी
कशाची नाही कमी । समारंभा ॥१२॥

सर्वांचे आशिर्वाद । सर्वांचे मिळो साहय
निर्विघ्न होवो कार्य । गणराया ॥१३॥

तूंहि अंबाबाई । समक्ष कार्या यावे
सिद्धिस कार्य न्यावे । .... बाळाचे ॥१४॥

● ● ● ●

# -: मंगलाष्टके :-

स्वस्ति श्रीगणनायकास नमिले कार्यासी आरंभिता
सिद्धीदायक तो असे गुणनिधी कर्ता तसा करविता
येती ते द्विजश्रेष्ठ मित्रजनहि या उत्सवाला आता
द्याया मंगल आशिषे वधुवरां कुर्यात् सदा मंगलम् ॥१॥

दारी मंडप हा असे सजविला लावनिया तोरणे
वाद्ये सुस्वर वाजती सुखविती आलाप आवर्तने
येती सर्व सुवासिनी प्रमुदिता लेऊनिया भूषणे
आहे मंगल कार्य आज सदनी कुर्यात् सदा मंगलम् ॥२॥

विद्यालंकृत हा सुयोग्य तुजला लाभे पति जीवनी
भाग्याचा जणू की वसंत फुलला तूझ्या मनःप्रांगणी
बाला तूहि तशी सुविद्य असशि त्यांते अनुरुपिणी
आला योग खराच आज जुळुनि शोभे हिरा कोंदणी ॥३॥

वाहे ही सरिता खळाळुनि पुढे भेटावया सागरा
होइ उज्वल ती उषा बघनिया तेजोनिधी भास्करा
भक्तिपूर्वक तूं प्रसन्नहृदये पुजोनी गौरीहरा
आशादोप सुरम्य घेऊनि करी जासी पतिमंदिरा ॥४॥

रामा जानकी शंकरास गिरिजा कृष्णास ती रूक्मिणी
तैसे ह्या विधीने तुम्हास आणिले एकत्र हो जीवना
दोघेहि सहजीवनांत रमुनी संसार मोदे करा
भाग्यश्री तुमच्या गृही प्रगटू दे कुर्यात् सदा मंगलम् ॥५॥

होई तूं गृहलक्ष्मी विजयीनी संसार क्षेत्रामधे
पति प्रेमळ, शक्ति प्रेरक, तशी हो सर्व कार्यामधे
आतिथ्यास प्रशस्त ठेव आपुल्या स्नेहे गृहस्थाश्रमी
होवोनी मधुभाषिणी विहर तूं आनंद-मंदाकिनी ।।६।।

अग्निब्राह्मण साक्षीने तुम्ही आता संबद्ध व्हा जीवनी
प्रीतीच्या सुममालिका उभयता कंठांत द्या घालुनी
चाला सप्तपदी करी कर तसा गुंफून ऐक्यामधे
देवो आयु तुम्हा सुदीर्घ प्रभु तो कुर्यात् सदा मंगलम् ।।७।।

व्हावे सावध 'सावधान' असती हे शब्द हो सूचक
जाणोनी यांतील सार मिळवा लौकीक आणि सुख
बांधा कंकण ते परस्पर करां धर्मास त्या आचरा
नांदा सौख्यभरे सदैव जगती कुर्यात् सदा मंगलम् ।।८।।

● ● ● ●

# अभिनंदन (नववधूचे)

आज सखे ग तव अभिनंदन
दोन जिवांचे हे चिरमीलन ।.धृ।।

मुदुल फुलांची ही वरमाला
करी शोभते तुझ्या आजला
अर्पायाची पतिदेवाला
आनंदाचा आहे हा क्षण ।।१।।

इच्छित तव अजि सफल जाहले
मोदभराने मानस डोले
आनंदाश्रू नयनी दाटले
पुलकित झाला देहाचा कण ।।२।।

जीवनांतले पर्व नवे हे
कौशल्याने तूं सजवावे
माप यशाचे पदरी पडावे
फुलव सुखाचे तूं नंदनवन ।।३।।

● ● ● ●

# विहिण (मुलांकडची)

विहीणीबाई काळजी वृथा
मुळी न करावी आपण आता ।।धृ।।

कन्या धन जे होते आपुले
विश्वासाने आम्हा दिधले
सांभाळू प्रेमाने सगळे
गृहलक्ष्मी ही स्वगृही येता ।।१।।

आज नवे हे जुळता नाते
आनंदाला येई भरते
सौख्याच्या मी शिखरी नांदते
संसाराचे सार्थक होता ।।२।।

आपुल्या सम मी आहे माता
कन्येसम हिज लाविन ममता
भेद न कांही स्नुषाअन् सुता
समदृष्टिने नित्य पाहता ।।३।।

विहीणी विहीणी आपण बहिणी
संगम आज कुलांचा दोन्ही
स्नेह वाढु दे अधिकांशानी
भाग्याची ही होवो सरिता ।।३।।

# विहिण (मुलीकडची)

आनंदाच्या ऐशा समयी मन कां व्याकुळते
सासरी लेक आज जाते ।।धृ।।

बहुमोलाची ठेव खरोखर
जिवापाड मी जपली आजवर
घालुनिया मायेची पाखर
करि आपुल्या निरविते ।।१।।

प्रेमळ आपण सासूबाई
सांगायला नको मुळीहि
वेडी माया स्वस्थ न राही
म्हणुनी पुन्हा विनविते ।।२।।

प्रेमाने वा कधि रागाने
शिकवा हिजला परोपरीने
रीतभातहि सर्व शिकविणे
जी गृहिणीस शोभते ।।३।।

व्यवहाराचे देणें घेणें
प्रसंग शोभा फक्त साधणें
जोडूं आधी स्नेहबंधने
हेच मनी चिंतिते ।।४।।

# आर्या वृत्तांतील कांही उखाणे

१) आर्य स्त्रीचा जगती पति आहे एक हो अलंकार
...... रावांसंगे मोदाने करिन नित्य संसार

२) मधुर असावी वाणी, वृत्तीची नम्रता सदा ठेवा
...... रांवा ऐसा लाभे मज जीवनांत हा ठेवा

३) मंगळागौरी माते पूजन मी करितसे मनोभावे.
...... च्या जीवावर अखंड सौभाग्य तूं मला द्यावे

४) दुधांत साखर जैशी, तैशी मी एकरुप पतिसंगे
...... च्या सहवासी उजळे संसार ज्योत सौभाग्ये

५) लतिका जेंवि तरुवरा पत्नि तशी भूषवी पतिगृहासी
...... रावांची मूर्ती पुजित राहिन सदा हृदयकोषी

६) सासर हे सौख्याचे, ममतेचे नित्य तेची माहेर
...... रावांच्या साठी आले सोडून सर्व परिवार

७) गौरीहरा पुजोनि मागितला मनपसंत हा भर्ता
...... च्या सौख्यास्तव वेचिन मम जन्म हा सखे! पुरतां

८) जीवनवेलीवरती नवकलिका आज साजिरी फुलली
...... राव ...... च्या संसारा पूर्णता अहा आली

९) ज्ञानासम ती प्रीती दिधल्याने अधिक वाढते जगती
...... रावांची मजवर, माझी त्यांचेवरी अढळ भक्ती

१०) सरिता सागर यांचा प्रीतीसंगम जसा मनोहारी
...... च्या सहवासी बहरे फुलबाग नित्य संसारी

# पाठवणी

कण्वमुनी सांभाळती शकुंतला बाला ।
करी पाठवणी तिची दुःख होई त्याला ।

वृक्ष हरिणींना वनलता सखियांना
जाता सोडुनिया पाणी आले डोळीयांना ।

राजा जनकाने पाळियले जानकीला
जाई रामासंगे रथातुनी अयोध्येला ।

मन निश्वासले झाले कर्तव्य पित्याचे
कन्या जाते म्हणुनिया अश्रू विरहाचे ।

तैशी .. .. बाई आज पतीगृही जाई
आला गहिवर अश्रू ढाळितसे आई ।

झाले सूनमुख केला भूषण शृंगार
भालावर सौभाग्याची खुले चंद्रकोर ।

नाजुकशी कळी भोळी आहे .... बाई
सांभाळा हो पतिराज आणि सासूबाई ।

पुरे आता शोक गडे पूस बाई डोळे
तुझ्या स्वागताला तुझे घर उत्सुकले ।

आम्ही सर्व देतो तुला शुभ आशिर्वाद
आनंदाने पतिसंगे .... बाई नांद ।

# आरती मंगळागौरीची

(चाल- भारती सृष्टिचे)

जयदेवी जयदेवी मंगलागौरी
अखंड सौभाग्य दे जन्मवेरी ॥धृ॥

सतीस आहे पति भूषण
कुंकुम-तिलक भाली लावून
अक्षय चुडे हाती लेवून
करुं या गौरीचे आज पूजन ॥१॥

श्रावणांत येती पर्जन्यधारा
शृंगार सृष्टिचा हिरवा न्यारा
पानांत फुलांचा फुले फुलोरा
उल्हसित होती वृत्तीहि साऱ्या ॥२॥

नाहुनि लेवूं वस्त्रे भूषणें
षोडषोपचार सुगंधी चुर्णे
बेल, पुष्पे दुर्वा षोडषपर्णे
पंचारती करुं मनोभावानें ॥३॥

मंगलागौरी करी मंगल
सौभाग्य राहू दे माझे उज्वल
ऐश्वर्य आरोग्य दे सुख शांती
हीच तुझ्या पायी आहे विनंती ॥४॥

# आरती हरितालिकेची

(चाल-भारती सृष्टिचे सौंदर्य खेळे)

ओवाळूं आरती हरितालिकेला
पूजूं या सख्यांनो देवी गौरीला ।धृ।।

भाद्रपद मासी तृतीया तिथी
करुनी लिंग पूजी सांबासी
शंकर तिजला पति लाभावा
केले प्रसन्न भक्तिने त्याला ।।१।।

प्रथम विवाह विष्णुशी ठरला
मनाने वरिले परी शंकराला
द्वादश वर्षे तप ते केले
भक्तिने सांबाला तिने जिंकले ।।२।।

कर्दळी खांब तोरणे लावा
मध्ये स्थापा तुम्ही शिवपार्वतीला
बेल पत्री दुर्वा सुमने सुगंधी
पंचामृता सहित पूजा साधावी ।।३।।

सख्यांनो भक्तिने व्रत आचरा
सुयोग्य लाभेल पती तुम्हाला
म्हणुनि पूजा हिमकन्येला
प्रसादे तिच्या मिळवा भाग्याला ।।४।।

• • • •

# आरती शारदेची

ओवाळू आरतिला । जय जय वाग्देवीला ।।धृ।।

गौरवर्ण मुख प्रसन्न
मंगलमय रुचिर ध्यान
प्रगट होती सत्वगुण
नमुं या अघनाशिनीला ।।१।।

विद्येचे तूं दैवत
भक्त तुझे ज्ञानवंत
विलसे हृदी स्फूर्तीज्योत
उजळी ह्या विश्वाला ।।२।।

शब्दब्रम्ही असंसि मग्न
लीलेने करिसी गान
काव्यविश्व दे फुलवुन
प्रमुदित करी जगताला ।।३।।

दुष्ट दुरित त्वरित हरी
अज्ञाना नष्ट करी
सुख शांती जगो वितरी
विनती ही जननी तुला ।।४।।

● ● ● ●

# आरती जगदंबेची

जय महन्मंगले विश्वचालके माते
पंचारती करिते उजळुनिया दीपाते ॥१॥

तूं मूळप्रकृती त्या पुराण पुरुषाची
तूं आदीमाया एकमेव ब्रह्माची
तूं शक्ति देवता विराट ह्या विश्वाची
हे जगज्जननी गे पाव आह्मा भक्ताते ॥१॥

जगी असुर मातता कोप तुझा आवरेना
शौर्याचे चढते स्फुरणहि अष्ट भुजांना
आरक्त अग्निसम नेत्र तुझे बघवेना
हे महाकालिके घेसी रौद्र रुपाते ॥२॥

तूं शुंभ-निशुंभ राक्षस दोन्ही वधिले
तूं महिषासुर ह्या दैत्याला मारियले
त्या घोर संकटामधुनि जगा तारियले
लाभूं दे कृपेचा अभय हस्त आह्माते ॥३॥

जय महा अंबिके वत्सलरुप धारिणी
जय महा लक्ष्मे विभव बुद्धिदायिनी
जय महा कालिके प्रखर शौर्यशालिनी
हे त्रिगुणात्मक तव रुप आम्हा मोहविते ॥४॥

दे आई आम्हा विशेष आयुरारोग्य
दे देवी आम्हा बुद्धि वैभव भाग्य
दाव या जीवनी नित उन्नतीचा मार्ग
मी वंदितसे तव पुनरपि पद युग्माते ॥५॥

# आरती वडाची

आरती वडराजा । मनोभावे केली पूजा
आपुल्या प्रसादाने । हेतु पूर्ण होवो माझा ।।धृ।।

अल्पायुषी सत्यवान । स्वये सावित्रीने वरिला
भक्तिच्या प्रभावाने । यमधर्म जिंकियेला ।।१।।

चातुर्य भक्तिभाव । सदाचार तिचा थोर
पाहुनी यमराज । देती तिज तीन वर ।२।।

श्वशुरास राज्य प्राप्ती । पुत्रलाभ पितयाला
सौभाग्य सावित्रीला । हर्ष सकलांसी झाला ।।३।।

सावित्री पतिव्रता । होती आदर्श सती
दोन्ही कुळे उद्धरुन । केली त्रिभुवनी कीर्ती ।।४।।

सुवासिनी आम्ही नारी । लेणे लेऊं कुंकवाचे
सौभाग्य अखंडित । राहो जन्मोजन्मी आमुचे ।।५।।

# आरती जिवतीची

जय जय जय आई जिवती
फुलांमुलांची तूंच देवता हो रक्षणकर्ती ।।धृ।।

शुक्रवारी श्रावण मासांतील
घरोघरी तव पूजन होईल
गंधफूल अक्षता घेऊनी तुजला ओवाळिती ।।१।।

अरिष्ट पीडा संकट हरुनी
दीर्घायुष आरोग्य देऊनी
रक्षी आम्हाला सदासर्वदा हीच तुला विनती ।।२।।

जिवंतिका तूं देवी अससी
जीवदान सकलांना देसी
सत्वशील संपन्न सुजन हे नांदू दे भारती ।।३।।

● ● ● ●

# आरती हनुमंताची

जय जय आरती हनुमंता
ओवळू या वायुसुता ।।धृ।।

श्रेष्ठ हा सेवक रामाचा । अलौकिक शक्तिबुद्धिचा
घेऊनि शोध जानकीचा । कथिला निरोप रामाचा
अढळ ती ह्याची स्वामीनिष्ठा ।।१।।

प्रचंड याचे उड्डाण । गेला सागर लंघून
वायुगतीने जाऊन । द्रोणागिरी आणि उचलून
पराक्रम काय वर्णू आता ।।२।।

त्रिभुवनी कीर्ति दुमदुमली । लंका ज्याने जाळियली
अचाट ऐसे सामर्थ्य । बलभीम नाम जया सार्थ
तरला रामनाम जपता ।।३।।

उग्र हा बहुत ब्रह्मचारी । कळीकाळाला हा भारी
करिता एकनिष्ठ भक्ति । देई भक्ताला शक्ति
स्मरणे सरती भयचिंता ।।४।।

• • • •

# डोहाळे

पुरवूं सखिचे या डोहाळे
आज करुं या सुख सोहाळे ।।धृ।।

लेक लाडकी कौतुकाची
ओटी भरा ग आज तियेची
स्त्रीजन्माचे सार्थक झाले ।।१।।

देहलता बघ ही रसरसली
नवगर्भाची कांती खुलली
मोदभराने मानस डोले ।।२।।

उपवनी जाऊं निसर्ग पाहूं
चंदेरी चांदण्यांत नाहूं
सौंदर्याने जग हे नटले ।।३।।

हिरवा शालू चुडाहि हिरवा
पानांचा हिंदोळा हिरवा
वेणीमधें हार माळले ।।४।।

सौभाग्यवती पतिची कांता
पुत्रवती तूं होशिल आता
मातृत्वाचे सूख आगळे ।।५।।

# आरती हनुमंताची

जय जय आरती हनुमंता
ओवळूं या वायुसुता ।।धृ।।

श्रेष्ठ हा सेवक रामाचा । अलौकिक शक्तिबुद्धिचा
घेऊनि शोध जानकीचा । कथिला निरोप रामाचा
अढळ ती ह्याची स्वामीनिष्ठा ।।१।।

प्रचंड याचे उड्डाण । गेला सागर लंघून
वायुगतीने जाऊन । द्रोणागिरी आणि उचलून
पराक्रम काय वर्णू आता ।।२।।

त्रिभुवनी कीर्ति दुमदुमली । लंका ज्याने जाळियली
अचाट ऐसे सामर्थ्य । बलभीम नाम जया सार्थ
तरला रामनाम जपता ।।३।।

उग्र हा बहुत ब्रह्मचारी । कळीकाळाला हा भारी
करिता एकनिष्ठ भक्ति । देई भक्ताला शक्ति
स्मरणे सरती भयचिंता ।।४।।

# डोहाळे

पुरवूं सखिचे या डोहाळे
आज करुं या सुख सोहाळे ।।धृ।।

लेक लाडकी कौतुकाची
ओटी भरा ग आज तियेची
स्त्रीजन्माचे सार्थक झाले ।।१।।

देहलता बघ ही रसरसली
नवगर्भाची कांती खुलली
मोदभराने मानस डोले ।।२।।

उपवनी जाऊं निसर्ग पाहूं
चंदेरी चांदण्यांत नाहूं
सौंदर्याने जग हे नटले ।।३।।

हिरवा शालू चुडाहि हिरवा
पानांचा हिंदोळा हिरवा
वेणीमधें हार माळले ।।४।।

सौभाग्यवती पतिची कांता
पुत्रवती तूं होशिल आता
मातृत्वाचे सूख आगळे ।।५।।

# डोहाळे

सखे ग बाई गुपित तुझे कळले
स्त्रीजन्माचे आज तुझ्या गे सार्थक ते जाहले ।।धृ।।

नवा फुलोरा ये वेलीवर
नव धान्याचे फुटले अंकुर
सुफलित होई वंश तरुवर
दोन मनांचे, दोन जीवांचे मंगल मीलन झाले ।।१।।

प्रसन्न वृत्ती ठेव हासरी
मनी आठवी सदा श्रीहरी
थोरांचे शुभ आशिष घे शिरी
उभय कुलांना भूषविण्याचे भाग्य तुला लाभले ।।२।।

सुखद क्लेश ते तूं अनुभवसी
रात्रंदिन त्या नादी रंगसी
आनंदाने हरखुन जासी
नव्या जीवाच्या चाहुलीने तव मनहि आनंदले ।।३।।

नव्या नवतीचा साजहि हिरवा
नव्या प्रीतीचा रंगहि हिरवा
हिरवा शालू चुडाहि हिरवा
हिंदोळयावर बसवुनिया तुज बांधिती फुलझेले ।।४।।

तुला सद्‌गुणी पुत्र होऊं दे
आकांक्षा तव पूर्ण करुं दे
वंशाचे सौभाग्य उजळूं दे
सप्रेमाने आज तुझे मी अभिष्ट चिंतियले ।।५।।

ग्रं. क्र. 96508
(स्थळ प्रत)

# डोहाळे

पुरवीन तुझे डोहाळे
करुनिया सर्व सोहाळे

स्त्रीजन्माच्या परमसुखाची
फलश्रुती ही मंगल साची
वृद्धि होई वंशतरुची
हेची शुभ गमले ।।१।।

पहिल्याचा गे अपूर्व महिमा
कोड कौतुका नाही सीमा
सौभाग्याचा खुलें चंद्रमा
मोदे मानस डोले ।।२।।

काय हवेसे तुला वाटते
नकोस लाजूं सांगाया ते
परोपरीची भरली ताटे
आणिली सुरस फळे ।।३।।

हिरवा शालू शोभे सुंदर
साज फुलांचा रुचिर तयावर
सुगंधित हे लावुनि अत्तर
तुजला तोषविले ।।४।।

नव्या पिढीचा नवा पाहुणा
उद्या अंगणी हसेल तान्हा
म्हणती आणवा नवा पाळणा
निजवाया सोनुले ।।५।।

थोर जनांना करुनि वंदन
शुभ आशिष घे त्यांचे मागून
प्रफुल्लित हे होवो जीवन
प्रभुच्या पाठबळे ।।६।।

# पाळणा-मुलाचा

निज रे आता निज वेल्हाळा
झोके देते तान्ह्या बाळा ।।धृ।।

रंगित पाळणा गादी शेवरीची
आंथरली वर चादर फुलांची
तुला पांघराया रेशमी हा शेला ।।१।।

देवस्वरुप हे बालरुप तव
ब्रम्हानंदी खेळे जीव
तुला पाहुनिया जीव सुखावला ।।२।।

पाळण्यांत घे झोप सुखाने
हांस, खेळ आणि स्वच्छंदाने
घरी दारी झाला तुझाच रे चाळा ।।३।।

बाळकडू देते शक्तिचे बुद्धिचे
भाग्यवंत बाळ स्वप्न हे उद्याचे
तुझ्या कर्तृत्वाचे भूषण आईला ।।४।।

# पाळणा – मुलीचा

झोके देते तुला लाडके अंगाई गाते
छकुले ! तुजला जोजविते ।।धृ।।

प्रीतिलतेवर कलिका पहिली
रंगरुपाने सुंदर नटली
की चंद्राची कोर चिमुकली
नभांगणी खेळते ।।१।।

मातृपदाची होता प्राप्ती
स्त्री जन्माची पटते महती
सर्व सुखाची ती परिपूर्ती
क्षणांत अनुभवते ।।२।।

तुझ्यामुळे हे शोभिवंत घर
भरले माझे चित्त सरोवर
उरांत दाटे माया पाझर
तृप्त करीन तूं ते ।।३।।

छत्र तुजवरी स्नेहप्रीतीचे
अलंकार घालीन गुणांचे
बाळकडू पाजीन तृप्तोचे
मंगल तव चिंतीते ।।४।।

• • • •

# मातृभोजन

रे थांब लाडक्या बाळा
भरविते घांस मी तुजला ॥ध्रु॥

तुज कुशीत मी वाढविले
चिमुकले घांस भरवियले
आद्यगुरु प्रेमळ बनले
कवतुक करूं दे आजला ॥१॥

हा घांस अति मोलाचा
मातेच्या शुभ इच्छेचा
स्नेहशील वात्सल्याचा
बलवंत करिल पुत्राला ॥२॥

गुरुगृही आता तूं जावे
विद्यार्जन पूर्ण करावे
ब्रम्हचर्य व्रत आचरावे
मान दे गुरुवचनाला ॥३॥

सर्वत्र गुणांची कीर्ति
विद्येची तैशी महती
विद्वान गुणी हो जगती
मज तोची सुखाचा सोहळा ॥४॥

## व्रतबंध प्रसंगी म्हणावयाची

## 卐 मंगलाष्टके 卐

आधी गौरीसुता आमंत्रण दिले धाडुनिया अक्षता
देवांच्या समवेत येऊनि करा कार्यामधे सिद्धता
अंबे ! श्रीकुलदेवते सकलहि देवासवे ये आता
आशिर्वाद अभिष्ट देइ बटुसी कुर्यात बटोर्मंगलम् ॥१॥

आला मंगल आज हा दिन पहा सृष्टि कशी हासते
वाटे सर्व विहंग ओळी मजला वाणी शुभा बोलते
येती कौतुक पाहण्यास ललना माता मनी मोदते
सप्रेमे शुभदायी मीहि तुजला आशिर्वचे बोलते ॥२॥

होता हा व्रतबंध जासी बटू तूं शास्त्रादि विद्यार्जनी
विद्यावैभव घे यशे मिळना हो धन्य साऱ्या जनी
लक्ष्मी आणि सरस्वती उभयता व्हाव्या अनुकूल त्या
देवो आयु तुला सुदीर्घ प्रभु तो कुर्यात् बटोर्मंगलम् ॥३॥

धर्मार्थास प्रमाण मान जगती आचार्य देवो भव
विद्येचे व्रत सेविण्यास असतो हा ब्रम्हचर्याश्रम
ज्ञानाचे धन ते अमोल असते सांगू किती थोरवी
दीक्षा घे गुरूची सुमंगलक्षणी कुर्यात् बटोर्मंगलम् ॥४॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ६४५६६ दि. ०१०८
वर्ग ९८८८ नों. दि. १२।३।०७

## श्री तुलसीच्या विवाहाची

# 卐 मंगलाष्टके 卐

श्रीमन्मंगलदायका गजमुखा आधी तुम्हा वंदिते
यावे हे शुभकार्य सिद्ध करण्या ऐसेची मी प्रार्थिते
अंबे ! श्री कुलदेवते सकलहि देवांसी ये घेऊनी
आहे आज विवाह श्रीतुलसीचा कुर्यात् सदा मंगलम् ।।१।।

कार्तिकातिल शुद्ध द्वादशी तिथी आहेच की योजिली
ऐशा ह्या शुभपर्वणीस सगळी ही सिद्धता जाहली
इक्षुमंडप हा अहा खुलतसे वृंदावनाच्या वरी
माला सुंदर झेंडुची दिसतसे तुलसी वधुच्या करी ।।२।।

सारे अंगण हे अहा ! सजविले रेखून रंगावल्या
सस्नेहे सगळीकडे आम्हि तशा ह्या दिपीका लाविल्या
टाकूं मंगल अक्षता सकलहि तुलसी हरीच्या वरी
सारे मंगल होऊं दे यदुपते ! कुर्यात् सदा मंगलम् ।।३।।

श्रीकृष्णा प्रिय जी असे अतिव ती तुलसी सखिश्यामला
प्रेमाने पुजिता तिला प्रतिदिनी होई सदा मंगल
शांती-तृप्ती सदा गृहांत विलसी आनंद ह्या जीवनी
देई आशीष सर्वदे ! भगवति ! कुर्यात् सदा मंगलम् ।।४।।

# खेळाचे गाणे

नाचूं या सख्यांनो नादांत। करूं या आनंदाची लूट

एक मताच्या आपण मैत्रिणी
स्वच्छंदाने गाऊं गाणी
तनमन विसरूनी धुंदीत। रंगु या खेळाच्या रंगात ॥१॥

जोडीजोडीने फुगडी दणाणे
परस्परांना घालू उखाणे
हात पाय होतील बळकट। सळसळे अंगांत नव रक्त ॥२॥

आगोटा पागोटा भरभर
अधांतरी ग उडू हवेवर
चपळाई येईल अंगांत। उत्साह वाटेल कामांत ॥३॥

लवलव वाकूं खाली सरसर
पिंगा घालूं चला ग गरगर
कंबर होईल मजबूत। भरदार दिसेल मान ताठ ॥४॥

एका पायी तोल धरूनिया
खेळ लंगडीचा चला खेळुंया
उणीव जरीहि जीवनांत। सोडणार नाहीच हिंमत ॥५॥

किसूं दोडकी घाईघाईने
काम करुं ग चढाओढीने
रमुं या सदैव कामांत। श्रमाचे मोल ह्या विश्वांत ॥६॥

सईबाईच्या कोंबडा रोज आरवतो
कधी तयाचा नेम न चुकतो
कुचराई नकोच कामात । कामांत हवीच अन् शिस्त ॥७॥

हातामधे हात गुंफु या
झिम्म्याचा ग फेर धरुं या
गीत गाऊं खड्या आवाजांत । पाय टाकूं एकाच ठेक्यांत ॥८॥

गोफ विणूं ग कला कुसरीने
रास रचूं ग तन्मयतेने
एकचित्त करा ग साधनेंत । मनांत नकोच ते द्वैत ॥९॥

# गाणें तिळगुळाचे

संक्रांतीच्या शुभसमयी या
परस्परांना वाण वाटूं या ।।धृ।।

नाते जोडूं सद्भावाचे
वाण देऊ या स्नेहप्रीतोचे
प्रतीक आहे तिळगुळ ज्याचे
अविट गोडी त्याची सेवूं या

धागे गुंफू नाजुक स्नेहल
कोष करूं या कोमल मंगल
सौहार्दाचा सुंदर परिमल
जनभृंगाला त्यांत रमवूं या ।।२।।

स्नेहपूर्ण हृदयाची पणती
लावूं प्रीतीच्या निर्मल ज्जोती
प्रेमे उजळूं मंगल आरती
प्रकाश साऱ्या जगती भरुं या ।।३।।

पूर्ण जाहली एक प्रदक्षिणा
सूर्य करितसे आज संक्रमण
तैसे करुं या सर्वांहि आपण
सुचिचाराचे व्रत आचरुं या ।।४।।

# गाणे कृष्णजन्माचे

मध्यरात्र काळोखी वद्य अष्टमी तिथी
मथुरेला कृष्णनाथ आज सखे ! जन्मती ॥धृ॥

कारागृह कंसाचे लखलखले त्या क्षणी
दाटुनि ये मोद अतिव देवकीच्या लोचनी
जगन्नाथ अंकावर घेई देवकी सती ॥१॥

बालरुप पाहुनिया वसुदेवहि हर्षला
पाटीमधे बाळकृष्ण ममतेने निजविला
देववाणी होइ त्वरित गोकुळी श्रीपती ॥२॥

माथ्यावर घेऊनिया चाले वसुदेव पुढे
यमुना मी ओधवती पाहुनिया चरण अडे ॥

चालः- मी कालिंदी श्रीकृष्णाची श्यामल वत्सल कांता ।
चरण चुराया लगबग तिथवर धावत गेले असता ॥

पदस्पर्शाने मोहित झाले नजर वळे खालती ।
मामंजी वसुदेव पाहुनि लाजुनि गेले पुरती ॥

आले तैशी त्याच पाऊली माघारी सखि वळले ।
बाई गौळणी काय सांगु तुज वृत्त असे तै घडले ॥

लोक समजती श्रीकृष्णांनी अघटित ऐसे केले ।
की यमुनेचे जीवन तत्क्षणी वाहुनिया गेले ॥

# गाणे रामजन्माचे

रघुकुलदीपक आज जन्मती
सनई चौघडे झडती नौबती ॥धृ॥

सुदिन सखे हा आज सुमंगल
पूनित झाले अवघे भूतल
आनंदाचा दाटे परिमल
होई कौसल्या पुत्रवती ॥१॥

अयोध्यापुरी ही शृंगारा
घराघरावर गुढया उभारा
साखर वाटा अवघ्या नगरा
दशरथास हो पुत्रप्राप्ती ॥२॥

शुद्ध नवमी ही चैत्रामधली
मध्यान्हाची घटिका आली
ऐशा ह्या शुभमंगल काली
श्रीविष्णू अवतरती जगती ॥३॥

तेजाने तिमिरास जिंकले
ज्ञानाने अज्ञान नाशिले
असुर मर्दण्या सुरपति आले
प्रेमभराने करुं आरती ॥४॥

त्रैलोक्याचा नाथ बाळ हा
विश्वाचा पाळणा हालवा
राजीवलोचन राम जोजवा
गाऊं या अंगाई त्याप्रती ॥५॥

# गाणे रंगाचे

बघूं या रंगाचा सोहळा
सखे ! श्रीरंग रंगी नाहला ।।धृ।।

सात रंगांच्या सात घागरी
घेऊनि गोप–सुंदरीं
चालल्या ग यमुनेतीरी
भिजविला हरीचा शेला ।।१।।

केशरी गर्द जांभळा
हिरवा नि तांबडा निळा
अशा रंगांच्या भरूनी चुळा
गोप गोपिंच्या वर उडविल्या ।।२।।

आला वसंत ऋतु फुलवाला
आंबेमोहर बाई घमघमला
उपवनी मोगरा फुलला
गळा घालुनि फुलांच्या माळा ।।३।।

कुंजवनांत हरी खेळतो
देवादिकांस हेवा वाटतो
वर्णावा काय थाट तो
पाहूं या हरीच्या लीला ।।४।।

चहूकडे गुलाल उधळिला
रंगित गाठचा शोभल्या
मेवा मिठाईचा ढिग लुटविला
तो प्रसाद घेऊ चला ।।५।।

# गोपाल काला

आणा शिदोऱ्या चला सख्यांनो यमुनेला जाऊं
सख्यांनो यमुनेला जाऊ
कृष्ण करितसे गोपाल काला प्रसाद तो घेऊ ।।धृ।।

कृष्ण कन्हैया नंदाचा
असे लाडका सकलांचा
वेडे केले गोकुळ अवघे त्यास चला पाहूं ।।१।।

संथ वाहते ती यमुना
शोभा येई कुंजवना
नाचे खेळे त्यांत चला ग परब्रह्म पाहूं ।।२।।

कांदा भाकर आणि चटणी
साखर पोहे दही लोणी
गोपगोपींच्या ओळीत बसुनी वनभोजनी जेवूं ।।३।।

गोपाळांच्या मेळयांत
कृष्ण खेळतो मोदांत
त्या खेळाच्या रंगी रंगुनी कृष्णरुप होऊं ।।४।।

अहंकार तो विसरूनी जा
समुदायाशी तद्रुप व्हा
एकत्वाच्या आनंदाचे स्वरुप ग पाहुं ।।५।।

# * भक्ती गीत *

## राग—यमन

विटेवरी उभा माझा सखा पांडुरंग
सखा पांडुरंग माझा सखा पांडुरंग ॥धृ॥

पंढरीत झाली दाटी भक्तमंडळींची
अर्हनिश गोडी तेथे नाम शर्करेची
हरी किर्तनांत झाले भक्त सारे दंग ॥२॥

चंद्राकार वाहे भीमा मधे वाळवंट
वाळवंट झाले आता निवृत्तीची पेठ
भक्तिभाव हाची तेथे नांदतो अभंग ॥३॥

रामकृष्ण हरी जपा मंत्र हाची सोपा
उणे काय आहे तेथे मुक्तिचिया सुखा
ज्ञानदेव तुकयाला विठ्ठलाचा संग ॥४॥

## राग – पिलु

येई येई विठ्ठला
धावत येई येई दयाळा ॥धृ॥

शुद्ध भाव हा या जीवाचा
घ्यावा जाणुनि प्रिय दुहितेचा
सदय हस्त शिरी ठेव कृपेचा ॥१॥

पतित मी रे तुचि पावन
मुर्तिमंत जगी तू करुणाघन
पाजी प्रीतीचे मज संजीवन ॥२॥

## राग – तिलंग

परम सुमंगल नाम प्रभु तव
परम सुमंगल नाम ।।धृ।।

जपता पावे चित्त विराम ।।
नामस्मरणे पापे जळती
अगणित पुण्याची हो प्राप्ती
चित्ता लाभतसे नित शांती
आनंदाचे धाम ।।१।।

नामे तरले ध्रुव प्रल्हाद
उद्धरले उद्धव आणि नारद
स्वस्वरुपाचा घेता शोध
झाले मन निष्काम ।।२।।

सुलभ असे बहु नाम प्रभुचे
घेई मना बा असे फुकाचे
सार्थक होइल या जन्माचे
आठविता श्रीराम ।।३।।

## राग – मिश्र तिलंग

धन्य धन्य जगी पुंडलिक भक्त
माय पितयाची सेवा हेच व्रत ।।धृ।।

माय परब्रह्म पिता हे दैवत
म्हणे ब्रह्मानंद त्यांचिया सेवेत
मग्न असो द्यावे मला त्यांत नित्य ।।१।।

अहर्निश त्यांच्या सेवेसी सादर
अन्य नसे कांही याहुनी विचार
सेवा ही पाहुनी तोषे भगवंत ।।२।।

धावुनिया येता तिथे श्रीविठ्ठल
म्हणे विटेवरी थांब थोडा वेळ
अजुनीहि उभा देव पंढरीत ।।३।।

(३७)

## राग – देशकार

सर्व संचिताचे पुण्य फळा आले
मज कैवल्य भेटले सये ग ।।धृ।।

भाग्य भेटीचे अपार
आनंदाला येई पूर
माझे भोळे मन त्यांत बुडोनिया गेले ।।१।।

श्रीक्षेत्र पंढरपूर
असे संताचे माहेर
माहेराच्या मायेमाजी मन लोभावले ।।२।।

माय माऊली विठाई
प्रेमामृत मज देई
किती प्राशु अमृताला मन तृप्त झाले ।।३।।

● ● ● ●

## राग – भिमपलास

विठुची गोजिरी स्वारी
आम्हाला आवडे भारी ।।धृ।।

नेसला पिवळा पिंतांबर
गळयांमधि तुळशीचे हार
शोभते रुप मनोहारी ।।१।।

राहिला उभा विटेवर
कटीवर ठेविले कर
मुकुट तो शोभे शिरावरी ।।२।।

अवतरे भिवरे कांठी
विठाई भक्तांच्या साठी
जाहली तारक संसारी ।।३।।

● ● ● ●

## राग – मालसंस

प्रभु ठाव देइ रे तुझ्यापदी
करकमले ही जोडित आधी ।।धृ।।
अज्ञानाते विलया न्यावे
शुद्ध ज्ञान ते मज लाभावे
परम कृपाळु तुजला भावे
आळविते मी मनामधी ।।१।।

सुखदु:खाच्या ह्या संसारी
वृत्ती माझी होई घावरी
तूं प्रेमाच्या वर्षं सरी
दाटो माझ्या मोद हृदी ।।२।।

● ● ● ●

## राग – यमन कल्याण

राम हरे गोविंद केशव
कृष्ण हरे गोविंद केशव ।।धृ।।
मुकुंदा मुरारी अहो चक्रधारी
कोण सांवरील मज या ससारी
तुम्ही ओळखावा माझा जीव भाव
माझा जीव भाव ।।१।।

तुम्ही दिनबंधु तुम्ही दयासिंधू
मज पामराला नका हो निखंदू
तुम्हा वाचुनिया नसे दुजा ठाव
नसे दुजा ठाव ।।२।।

● ● ● ●

## राग – दरबारी कानडा

तूं असता पाठीशी कां रे भय मी मानावे
अनन्यदाता तूं भगवंता बळ मजला द्यावे ॥धृ॥

या देहाची काय शाश्वती
काय कसे ते आहे पुढती
देइ ईश्वरा मजला सन्मती
हे तुज मागावे ॥१॥

चंचल सारा वित्त पसारा
उडून जाइल येता वारा
तुझिया पायी लाभो थारा
म्हणुनि तुला ध्यावे ॥२॥

या देहाचा विसर पडुं दे
कणांकणांतच गीत भिनूं दे
तुझिया ठायी चित्त विरुं दे
हे मी जोडावे ॥३॥

## राग – भैरवी

हरी भजनाचा एकच चाळा
माझ्या जीवा रे लागावा
रे लागावा रे लागावा ॥धृ॥

भजनामाजी जीव डोलूं रे
चित्ताच्या ह्या वृत्ती फुलुँ दे
आनंदाश्रू नयनी दाटूं दे
देहाचाहि विसर पडावा
विसर पडावा, विसर पडावा, ॥१॥

हरी भजनाची अवीट गोडी
त्या गोडीने झाले वेडी
भक्तीची ही पायी बेडी
घालण्यांत मज तोष असावा
तोष असावा, तोष असवा ॥२॥

# काही गजर

## गणपतीचा

श्री गजानन जय गजानन
जय जय गजानन मोरया
जय जय गजानन मोरया
जय जय गजानन मोरया

● ● ● ●

करा काम, काम, काम
घ्या विठोबाचे नाम
चित्त पावेल विराम
आनंदेल आत्माराम ।।१।।

हात गुंतले कामी
चित्त रंगले नामी
किती मोदाच्या उर्मी
मन होता पूर्णकाम ।।२।।

● ● ● ●

माझा देव माझा धर्म । धृ।।
माझे काम माझा नेम
हाची मजला आराम ।।१।।

● ● ● ●

## राग – बागेश्री

ही माझी पंढरी, पंढरी
भेटी द्याया हसतमुखानें स्वयेच ये श्रीहरी श्रीहरी ।।धृ।।

प्रेमजलाने नाहू घालते
भक्तिचा नैवद्य दाविते
भावफुले ही पायी अर्पिते
गोड करूनि घे श्रीगिरीधारी ।।१।।

आनंदाचा गमत सोहळा
जिवाशिवाचा योग आगळा
सुकृत आले काय की फळा
फिकी त्यापुढे सौख्येसारी ।।२।।

● ● ● ●

## राग – जैजैवंती

शरण तुला भगवंता, वंता
तुजविण त्राता, कोणी न आता ।।धृ।।

ह्या दीनेची एक विनंती
ऐकुनि घ्याहो तुम्ही श्रीपती
कंठहि सुकला तुज आळविता ।।१।।

कीर्ति तुझी ती त्रिभुवनी गाजे
काय तुला रे माझे ओझे
माऊलीवरती जैशी सत्ता ।।२।।

● ● ● ●

## राग – भीमपलास

मनी माझ्या गोकुळ हसते ग
मी नादांतच त्या रमते ग ।।धृ।।

श्याम सांवळा तो गिरीधारी
वाजवितो अति मधुर बासरी
वृत्ती राधा होइ बावरी
त्या रंगातच विरघळते ग ।।१।।

हरीभक्तीची प्याले मदिरा
वेडा झाला जीव हा पुरा
व्यर्थंच गमतो सर्व पसारा
ते श्रेयच पदरी पडते ग ।।२।।

गतजन्मी कां होते मीरा
भजनी गेला जन्मच सारा
त्याचा हा अवशेष की जरा
हे शुभवरदानची गमते ग ।।३।।

## चाल – फटक्याची

कलीयुगी ह्या असा । फुकाचा भक्तिचा घ्या वसा ।।धृ।।
ह्या मार्गाने गेले अवघे साधुसंत सज्जन
नाम हरीचे, घेऊनि वाचे, तुम्हीहि व्हा पावन
नश्वर ह्या देहाचा जन हो कांही नसे भरवसा ।।१।।

भजनाला ह्या रंग भरतसे दंग त्यांत होऊं या
भावाचा हा प्रभु भुकेला त्यास चला आळवूं या
प्रेम रज्जुनी, त्यास बांधुनि आणूं इथे हा असा ।।२।।

## राग – मिश्र देशकार

देवा तुझी आठवण मज राहो अहोरात्र
अणुरेणुत पहाते तुझे रूप मी सर्वत्र ।।धृ।।

तूंच सर्वसाक्षी असती
भलीबुरी बुद्धि देसी
हेच मागणें पायाशी
दाव योग्य वाट ।।१।।

निराकार तूं निर्गुण
मना पटे तूझी खूण
तुझे भजन संकिर्तन
घडो घावे नित्य ।।२।।

रुक्ष जगाचा व्यवहार
पिचोनिया जाइ उर
जीवनाचे हेच सार
काय मानूं सत्य ।।३।।

## राग – पिलू

गुरु कृपा झालियावरी
ध्येय मग काय असावे दुरी ।।धृ।।

परमार्थाचे अंजन घाली
स्वार्थ समूळ हा स्वकरे जाळी
स्वात्मसुखाच्या मार्गा उजळी
घेऊनि दीप करी ।।१।।

सद्‌गुरु जीवनी ज्यास भेटला
अंत नसे त्या सौभाग्याला
मोक्ष सुखाचा लाभ जाहला
ह्या नर जन्मांतरी ।।२।

● ● ● ●

## राग – सोहोनी

घ्या हो रामनाम आधी
विसराया भवक्लेश उपाधी ।।धृ।।

रामनाम हे दिव्य औषधी
अंतर्बाह्य तनुची शुद्धी
आनंदाची होई वृद्धि
घडता ऐसा वास प्रभुपदी ।।१।।

तुलसीदास हनुमंत कबीर हे
रामभक्त जगी होऊनि गेले
नर जन्मांतून मुक्त जाहले
त्रिभुवनी त्यांची होइ प्रसिद्धी ।।२।।

● ● ● ●

## राग – देसी

गाईन गाईन गान हरीचे
गाता गाता रंगुनि जाईन
घेईन सुमधुर तान ।।धृ।।

चित्तवृत्ती ही रमली नामी
सार्थक वाटे झाले नामी
हरीच गमतो सौख्यनिधान ।।१।।

संगे साऱ्या येतिल भगिनी
ताल सुरांचा मेळ साधुनी
हरीभक्तिचे वाटीन वाण ।।२।।

* * * * *

## चाल – ठुमरीची

लागलासे छंद मजला लागलासे छंद
जनीवनी शोधत फिरते आनंदाचा कंद ।।धृ।।

मोरमुकुट शोभे कंठी वैजयंती माळा
केशरी उटीतीभाळी कस्तुरीचा टीळा
मोहवी मनाला ऐसा सांवळा मुकुंद ।।१।।

देहभान नुरले कांही हरीमय होता
त्रिविध ताप तेहि निमाले नाही भय चिंता
हरी हरी म्हणता वृत्ती जाहलीसे धुंद ।।२।।

क्षणिक सुखे मातीसम ती तुच्छ वाटतात
रंगुनिया जाई जीव दिव्य संगितात
तुटोनिया जावा सारा संसाराचा बंध ।।३।।

* * * * *

## राग – भैरवी

कृपावंत देव मनी आठवावा
मनी आठवावा मनी सांठवावा ।।धृ।।

भक्तकाम कल्पद्रुम
श्रांत जिवाला विश्राम
जिथे तिथे आहे राम
शोधुनि पहावा ।।१।।

प्रेमरूप सर्वाठायी
भेदभाव हृदयी नाही
अशी भक्तिची पुण्याई
हाच असो ठेवा ।।२।।

* * * * *

## राग – बिलावल

सद्‌गुरुनाथा उद्धरा आम्हाते
श्रीगुरुनाथा उद्धरा आम्हाते ।।धृ।।

तुम्ही गुरुराज
बुद्धि द्यावी मज
दर्शनासी आज
आले येथे ।।१।

असा योग आला
आज पर्वणीला
आमंत्रिले मला
ऐसे वाटे ।।२।।

कृपा कर स्वामी
दीन पतित आम्ही
भक्त आपुली मी
म्हणविते ।।३।।

* * * * *

## चाल – ओवीची

पंढरीच्या वाटेवरी मळा फुले आनंदाचा
काय सांगु सखेबाई गमे सोहळा सौख्याचा ।।१।।

पंढरीच्या वाटेवरी । दिड्या पताकांचा भार
विठ्ठल नामाचा गजर । होतो बाई अपरंपार ।।२।।

पंढरीच्या वाटेवरी । निनादती टाळ वीणा
कैवल्याच्या खाणाखूणा । विचाराव्या संतजना ।।३।।

पंढरीच्या वाटेवरी असे सोबत संतांची
एकामेका साह्य देती । वाट चालती मोक्षाची ।।४।।

पंढरीच्या वाटेवरी । खुली सद्भक्तिची पेठ
काया वाचा मने करूनि । होइ विठ्ठल अंकित ।।५।।

पंढरीच्या वाटेवरी । पायधूळ ही संताची
माथा झेलू कंठी लावू । अशी पर्वणी भाग्याची ।।६।।

पंढरीच्या वाटेवरी । घालू घालू लोटांगण
असे जोडिले की पुण्य । घडे विठ्ठल दर्शन ।।७।।

* * * * *

## राग – असावरी

हेची पुण्य माझे । भक्तिची आवडी
लागलीसे गोडी । विठ्ठलाची ।।धृ।।

चाखुनि बघा हो । कैवल्याचे सुख
संताची पारख । ऐशी थोर ।।१।।

नामाचा गजर । चित्त एक सूर
आनंदाचा पूर । दाटे तेथे ।।२।।

पमा म्हणे ऐसे । संताचे हे ऋण
फेडुनिया धन्य । होइ जीव ।।३।।

* * * *

## राग – चंद्रकंस

मी तुजला पाहते, देवा
जळी स्थळी पाषाणी तुजला
तुजला मी शोधिते ।।धृ।।

सर्व जगाचे हे अनुशासन
तुझ्याच देवा आहे आधिन
कर्माचे हे त्यास्तव बंधन
म्हणुनि तुजला मी आळविते ।।१।।

कांही नसता आपुले हाती
उगिच कशाला मी मी म्हणती
कर्मास्तव दे उदंड शक्ति
निशिदिनी देवा तुजला स्तविते ।।२।।

★ ★ ★ ★

## राग – भीमपलास

दाखवा विठ्ठल दाखवा विठ्ठल ।।
पाहायाची डोळाभर । आंस ही केवळ ।।धृ।।

कंठीहार घालूं । वंदुनि चरण
भावे होऊं लीन । त्याचे पायी ।।१।।

सांवळे सगुण । विठ्ठलाचे ध्यान
आनंदले मन । पाहताची ।।२।।

भोळा विठुराज । ऐके नामयाचे गूज
माझी हौस आज । पुरवील ।।३।।

★ ★ ★ ★

## राग – मांड

तुम्ही हो साधुसंत सद्‌गुरु
कलीयुगी साक्षात् कल्पतरु ।।धृ।।

तुम्ही उजळली ज्ञानदिपीका
ग्रंथरुपी विज्ञान वाटिका
साधक बाधक सारी टीका
आदरे आम्ही अवधारु ।।१।।

नेणीव सारी दूर सारुनि
जाणीव आम्ही दिधली करुनि
स्वात्म सुखाचा मार्ग दाऊनि
सागरी गमत जसे तारु ।।२।।

रामायण महाभारत गीता
रचिली आपण स्वये तत्वता,
दूर दृष्टीने कथितो द्रष्टा
मार्ग तो भक्तीचा आचरु ।।३।।

* * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संग्र. शाखा

## राग – देस

मी इथून सोहळा बघते
मनाने पंढरीला जाते ॥धृ॥

असंख्यात सद्भक्त मिळोनी
दर्शनार्थ ते येती दुरुनी
आम्हीहि जमलो साऱ्या भगिनी
भजनालाहि येई भरते ॥१॥

मुंगीलाहि रिघ न तीळभर
असा पसरला मानव सागर
अपूर्व होतो विठ्ठल गजर
त्याचे चरणी वृत्ती रमते ॥२॥

भेदाभेद तिथे ना कांहीं
सान थोर ते जमती सर्वहि
नादाची माधुरी दिव्य हीं
भक्तिरसाची लूट त्या तिचे ॥३॥

वारकऱ्यांचे दैवत भोळे
विटेवरी परब्रह्म ठाकले
पंढरपूरहि पावन झाले
प्रेमामृतहि पुरुन उरते ॥४॥

★ ★ ★ ★

# गौळण

वाऱ्यावरुनी लहरत येती सूर बासरीचे
ऐकुनि हरपे देहभान ते धुंद राधिकेचे ।।धृ।।

उतास गेला गोरस सगळा
मांजर आले चुकवुनि डोळा
फस्त करी लोण्याच्या गोळा
सासुबाई करिती ठणाणा थेर बघुनि हिचे ।।१।।

भातामधे मीठ टाकले
वरण परंतु आळणी राहिले
तिखट दुहेरी त्यांत घातले
भुरका घेता पित्त खवळले रागीट नवऱ्याचे ।।२।।

बाळ भुकेले रडत राहिले
स्तनपानहि त्या नाही दिधले
अर्धेमुर्धे टाकुनि सगळे
धावत जाई चरण सेविण्या नंद किशोराचे ।।३।।

मृगी जशी गीताने भुलते
नागीण जैशी गंध सेविते
चंद्रास्तव ती चकोर झुरते
चित्त तसे हे कृष्णाठायी जडले राधेचे ।।४।।

* * * *

## राग – भैरवी

तुझ्या कृपेच्या जलधारांनी सरेल दुःख उन्हाळा
हरी रे धाव पाव नंदलाला ॥धृ॥

तूं करुणाघन वर्षसी जीवन
पिऊन झाले प्रसन्न पावन
निवतिल माझे कृतार्थ लोचन
जीव तुझ्यास्तव रे आतुरला ॥१॥

दुःखाने हा जीव पोळला
ताप मनाला असह्य झाला
चिंतेने मम कंठहि सुकला
झणी धावत ये उशिर कशाला ॥२॥

दुर्बळ जगी मी तूं परमेश्वर
निर्धन मी तूं अससि कुबेर
पदर पसरिते नित्य कृपा कर
विनंती तुजला भक्तवत्सला ॥३॥

* * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८४५६६
९२/३/८७

# आत्मबोध (श्लोक)

विश्वांतरी व्यापुनि राहिला जो
असे सर्वसाक्षी अनादि असे जो
नसे मध्य ना अंत नाही जयाला
नसे पाश ना नाश, ना क्लेश त्याला ॥१॥

स्वयंपूर्ण जो स्वप्रकाशित ज्याला
नसे मोह, ना काम, ना क्रोध त्याला
असे सच्चिदानंद हो रुप ज्याचे
करी रे मना ध्यान त्या ईश्वराचे ॥२॥

नको आठवूं काळ जो पाठी गेला
नको त्रासवूं रे स्मृतींनी मनाला
मढी दुस्मृतींची पुन्हा काढुनिया
कशाला आता शोक रे व्यर्थ वाया ॥३॥

नको बाळगूं भीति केव्हा कधीहि
असे पाठीराखा तुझा राम पाही
जसा भाव तैसा जगी देव राही
कृपाळुपणे भक्त कैवार घेई ॥४॥

जरी प्राप्त होइ विपत्काल मोठा
नको बोल देऊं प्रभूलाच खोटा
जसे पेरिले धान्य तैसेच येई
जसे पूर्व संचित तैशी गतीहि ॥५॥

सदा ठेवणें स्थीर चित्तास बाई
न व्हावे कधी द्वंद्व वृत्तीमधेहि
सदा लोकसंवाद ऐकून घ्यावा
स्वये आपुला मार्ग तो ओळखावा ॥६॥

सुखाची स्थिती गेली दुष्काळ आला
स्मरोनी झुरावे वृथा तूं कशाला
होवोनी गेले तया वीसरावे
तुवा वर्तमानी सुखाने असावे ॥७॥

असे भूपती वैभवाच्या शिराला
असे त्याहुनी इंद्र मोठ्या पदाला
म्हणोनी जरी भूपती कष्टी झाला
कुठोनी बरे सौख्य त्या पामराला ॥८॥

नसे सौख्य वित्तांत ना पुत्रकांतेंत
नसे कीर्तिरुपांत, ना लौकिकांत
असे पूर्ण संतोष ज्याच्या मनाला
उणे काय आहे तयाच्या सुखाला ॥९॥

सदा बोलणे सर्व लोकांत सत्य
निंदा स्तुतीची करावी न खंत
जसा शब्द तैसा प्रतीशब्द येई
जगाची असे रीत ऐशी सदाहि ॥१०॥

नको घालवूं काळ तूं आळसांत
नको टाकूं सोन्यास माती खड्यांत
करावे तुवा देह शब्दास सार्थ
सदा काळ जावा हरी चिंतनांत ॥११॥

॥ समाप्त ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 96304

REFBK-0018304

REFBK-0018304